कर्नाटक सरकार

गणित

MATHEMATICS

(Revised)

3

इयत्ता तिसरी

3rd Standard

मराठी माध्यम

Marathi Medium

भाग – 2

Part - II

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

Karnataka Text Book Society (R.)
6th Cross, Malleshwaram,
Bengaluru - 560 003.

भाग - २

अनुक्रमणिका

L8Z1M8

अ.नं	प्रकरण	पृष्ठ क्रमांक
6.	भागाकार	1 - 12
7.	बौद्धिक अंकगणित	13 - 25
8.	अपूर्णांक संख्या	26 - 44
9.	पैशाचे व्यवहार	45 - 67
10.	मापन - लांबी - वजन - कालमापन	68 - 104
11.	माहिती हाताळणी	105 - 114
12.	नमुने	115 - 142

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण 6

भागाकार

I6Y3X5

हे प्रकरण शिकल्यानंतर तू

- समान वाटप करणे व समान गट करणे यातून भाग काराचा अर्थ समजून घ्याल.
- गुणाकार व भागाकार यांचा संबंध समजून घेशील.
- भागाकाराचे घटकांश समजून घ्याल - गट करण्याच्या पद्धतीने व गुणाकाराच्या पाढयांचा उपयोग करुन.

@ITPS NOT TO BE REPUBLISHED

समान वाटप करणे व गट करणे

1. राजूची तब्येत बरी नव्हती म्हणून तो डॉक्टरांच्या कडे गेला डॉक्टरने राजूला तपासले व आठ गोळ्या दिल्या आणि रोज दोन गोळ्या घ्यायला सांगितले.


तर राजूला त्या आठ गोळ्या घेण्यास किती दिवस लागतील?

पहिल्या दिवशी घेतलेल्या गोळ्या =

दुसऱ्या दिवशी घेतलेल्या गोळ्या =

तिसऱ्या दिवशी घेतलेल्या गोळ्या =

चौथ्या दिवशी घेतलेल्या गोळ्या =



8
-2
6

6
-2
4

4
-2
2

2
-2
0

म्हणून राजूला आठ गोळ्या घेण्यास 4 दिवस लागतील

∴ 8 लरप लश सींीिशिव ळपीं 4 सींीिी शरलह हरींळपस 2.


२ चे ४ गट म्हणजे ८ होतात

2. लताजवळ 12 फुगे आहेत. तिने आपल्या 4 मैत्रिणींना ते समान वाटले. तर प्रत्येकीला किती फुगे मिळतीत?



प्रथम लताने 4 मैत्रिणींना एकेक फुगा दिला

$$\begin{array}{r} 12 \\ -4 \\ \hline 8 \end{array}$$



नंतर प्रत्येकीला आणखी एकेक फुगा दिला

$$\begin{array}{r} 8 \\ -4 \\ \hline 4 \end{array}$$



उरलेले 4 फुगे पण प्रत्येकीला एकेक दिले

$$\begin{array}{r} 4 \\ -4 \\ \hline 0 \end{array}$$



∴ 12 फुगे प्रत्येकीला 3 याप्रमाणे

∴ 12 मध्ये 3 चे 4 समान गट

∴ **म्हणजे** $12 \div 4 = 3$

$$\begin{array}{r} 3 \\ 4\overline{)12} \\ 12 \\ \hline 00 \end{array}$$

भागाकार हे वजाबाकीचे सरळ रुप आहे.

÷ हे भागाकाराचे चिन्ह आहे.

''समान वाटप करणे किंवा गट करणे या पद्धतीला भागाकार असे म्हणतात''.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास 6.1

I. चित्रात दाखविलेल्या चेंडूंचे तीन समान गट कर.




2. चित्रात असणाऱ्या माशांचे 4 गट कर.



3. चित्रात असणाऱ्या प्राण्यांच्या मुखवट्यांचे 2 गट कर.



4. चित्रात असणाऱ्या गोट्यांचे 5 गट कर.




5. चित्रात दिसणाऱ्या लॉलिपॉपचे 6 गट कर.



© BALBHARATI NOT TO BE REPUBLISHED

II. एकेका दोऱ्यामध्ये समान मणी येतील अशा प्रकारे दिलेले मणी दोऱ्यामध्ये ओव.

उदा : 9 मणी 3 दोऱ्यांमध्ये ओव.




सूचना
एका वेळेला एकच मणी ओवा


1. 20 मणी 5 दोऱ्यामध्ये ओव.




2. 24 मणी 4 दोऱ्यामध्ये ओव.



3. 36 मणी 6 दोऱ्यामध्ये ओव.



4. 14 मणी 2 दोऱ्यांमध्ये ओव.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED


भागाकार आणि गुणाकाराचा संबंध

3 वेळा 4, म्हणजे 12 होतात.

4X3=12



12 फुले = 4 चे 3 गट करता येतात. 12÷4=3



$$\begin{array}{r} 4\,)\,1\,2\,(3 \\ 1\,2 \\ \hline 0\,0 \end{array}$$

गुणाकार रुप		भागाकार रुप
4 x 3 = 12	→	12÷4=3
3 x 4 = 12	→	12÷3=4

प्रत्येक गुणाकाराच्या रुपाला अनुसरुन भागाकाराचे रुप असते.

गुणाकार व भागाकार हे एकमेकांशी संबंधित असतात.

उदा:

1. 6 x 2 = 12 → 12÷2=6, 12÷6=2
2. 4 x 7 = 28 → 28÷7=4, 28÷4=7
3. 8 x 3 = 24 → 24÷3=8, 24÷8=3

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास 6.2

I. रिकाम्या जागा भर

1. 7x3=21 तर, 21 ÷ 3 = ...
2. 9x6=54 तर, 54 ÷ 6 = ...
3. 5x8=40 तर, 40 ÷ ..... = 5
4. 5x2=10 तर, 10 ÷ 2 = ...
5. 3x6=18 तर,.....÷ 6 = 3
6. 7x9=63 तर, 63 ÷ ..... = 7

II. खालील भागाकाराचे स्वरुप व गुणाकाराचे स्वरुप यांच्या रेष मारुन जोड्या जुळव

	अ	आ
1)	8 ÷ 2 = 4	5 x 3 = 15
2)	20 ÷ 4 = 5	9 x 3 = 27
3)	18 ÷ 2 = 9	4 x 2 = 8
4)	15 ÷ 3 = 5	5 x 4 = 20
5)	27 ÷ 3 = 9	8 x 2 = 16
6)	16 ÷ 2 = 8	9 x 2 = 18

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

III. खाली दिलेल्या गुणाकार स्वरूपाला अनुसरुन भागाकाराचे स्वरुप लिही.

1. 8 x 4 = 32 → 32÷4=8, 32÷8=4

2. 9 x 8 = 72 →

3. 7 x 6 = 42


4. 8 x 7 = 56

5. 10 x 5 = 50


गट करुन भागाकार कर.

अकबरजवळ 12 पेन आहेत. तो सर्व पेन 4 पेन स्टँड मध्ये समान ठेवतो. त्याला मदत कर.

प्रथम एकेक पेन स्टँडमध्ये ठेव.



नंतर आणखी एकेक पेन स्टँडमध्ये ठेव.



उरलेले 4 पेन एकेक पेन स्टँड मध्ये ठेव.



म्हणजे 12 मध्ये 3 चे 4 गट करता येतात.

$\therefore 12 \div 4 = 3$

© BOKTBS NOT TO BE REPUBLISHED

पाढयाचा वापर करुन भागाकार कर.

गुणाकाराचे पाढे वापरुन भागाकार करु शकतो.

$12 \div 4$

4 हे 3 वेळा = 12 ला समान $4 \times 3 = 12$

$\therefore 12 \div 4 = 3$

भाज्य

भाजक 4) 1 2 (3 भागलब्ध

1 2

0 0

उदा: 1) $45 \div 5$

5 हे 9 वेळा म्हणजे 45 ला समान $= 5 \times 9 = 45$

$\therefore 45 \div 5 = 9$

$45 \div 5 = 9$

↓ ↓ ↓

भाज्य भाजक भागलब्ध

भाज्य

भाजक 5) 4 5 (9 भागलब्ध

4 5

0 0

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

∴ भाज्य ÷ भाजक = भागलब्ध

किंवा

भाजक) भाज्य (भागलब्ध

उदा : 2) $28 \div 7$

7 हे 4 वेळा म्हणजे 28 ला समान.

$\therefore 28 \div 7 = 4$

भाज्य

भाजक 7) 2 8 (4 भागलब्ध

2 8


0 0

* कोणत्याही संख्येला 1 ने भागल्यास भागलब्ध तीच संख्या येते.
  उदा: $3 \div 1 = 3$, $4 \div 1 = 4$, $5 \div 1 = 5$
* कोणत्याही संख्येला त्याच संख्येने भागल्यास भागलब्ध 1 येतो.
  उदा : $3 \div 3 = 1$, $4 \div 4 = 1$, $5 \div 5 = 1$

अभ्यास 6.3

I. दिलेल्या वस्तूंचे समान गट कर व भागाकार स्वरूपान लिही.

1. एकूण अंडी = 16




प्रत्येक गटात असलेली अंडी = 4

∴ एकूण गट = 4

16 ÷ 4 = 4

2. एकूण सफरचंदे = 30



प्रत्येक गटात असलेली सफरचंदे = 6

∴ एकूण सफरचंदांचे गट = ...

.....

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. एकूण घागरी = 9




प्रत्येक गटात असणाऱ्या घागरींची संख्या = 3

∴ एकूण गट = ...

.....

4. एकूण मेणबत्या = 40




प्रत्येक गटात असलेल्या मेणबत्यांची संख्या = 5

एकूण गट .....

.....


5. एकूण भोवरे = 18
प्रत्येक गटात असणाऱ्या
भोवऱ्यांची संख्या ..... = 2
एकूण गट .....



II. गुणाकाराचे पाढे वापरुन भागाकाराच्या स्वरुपात लिही.

1. 16 मुली आहेत. दोन मुलींचा
मिळून एक संघ होतो. तर असे
किती संघ तयार होतील ?
16 ÷ 2 = 8 उत्तर : 8 संघ

$$\begin{array}{r} 2\,)\,16\,(8 \\ 16 \\ \hline 00 \end{array}$$




2. 18 झाडे.
3 ओळी.
तर प्रत्येक ओळीत झाडे किती?
..... उत्तर .....



3. 36 चॉकलेट आहेत.
एकाला 4 चॉकलेट मिळाल्यास एकूण
मुलांची संख्या किती?
..... उत्तर .....



4. 10 ब्रेडचे तुकडे आहेत. एक सँडविच
तयार करण्यास 2 तुकडे लागतात.
∴ एकूण किती सँडविच तयार करु शकता?
..... उत्तर .....




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

5. 64 सैनिक आहेत प्रत्येक ओळीत 8 सैनिक असतील तर एकूण किती ओळी असतील ?

..... उत्तर .....



III. खाली दिलेल्या संख्यांचा भागाकार कर व चित्रात असलेल्या त्या उत्तराला एकेका रंगाने रंगव.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. 6 ÷ 2

2. 60 ÷ 10

3. 49 ÷ 7

4. 8 ÷ 8

5. 20 ÷ 5

6. 18 ÷ 9

7. 5 ÷ 1

8. 30 ÷ 3

9. 81 ÷ 9

10. 72 ÷ 9

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

*****

प्रकरण 7

बौद्धिक अंकगणित

B1F2W2

हे प्रकरण शिकल्यानंतर तू

* एक अंकी व दोन अंकी संख्यांची बेरीज व वजाबाकी मनातल्या मनात करशील.
* दोन अंकी संख्या मनातल्या मनात दुप्पट करशील. (उत्तर दोन अंकी असाव)

जादूच्या चौरसाचा खेळ

कृती 1 :






2	+	4	+	2
+				+
5		8		3
+				+
1	+	4	+	3

2 + 4 + 2 = 8
2 + 5 + 1 = 8
1 + 4 + 3 = 8
2 + 3 + 3 = 8

© ETBS NOT TO BE REPUBLISHED

कृती 2 :






2	+	3	+	5
+				+
		10		
+				+
	+		+	

2 + 3 + 5 = 10
_ + _ + _ = 10
_ + _ + _ = 10
_ + _ + _ = 10

कृती 3 :

संख्यांच्या बरोबर खेळा



जॉन, राधा, गौरी, प्रकाश व ज्योती हे सर्वजण मिळून चिंचेच्या झाडाखाली पडलेले चिंचोके गोळा करण्यास गेले. सर्व चिंचोके गोळा करुन त्यांनी आपापल्या पिशवीत ठेवले. त्यांच्याजवळ असणाऱ्या चिंचोक्यांचे निरीक्षण कर व मनातल्या मनात बेरीज कर.

* जॉन व राधा या दोघांच्या जवळ असणारे चिंचोके = 38 चूक की बरोबर ते लिही _____
* गौरी व प्रकाश या दोघांच्याकडे असणारे एकूण चिंचोके = _____
* ज्योतीपेक्षा राधाजवळ किती जास्त चिंचोके आहेत = _____
* गौरी आणि जॉन यांच्याजवळ समान चिंचोक्यांची संख्या होण्यासाठी जॉनला अजून 7 चिंचोके गोळा करण्याची आवश्यकता आहे. हे बरोबर आहे की चूक समजून घे _____
* राधा आणि ज्योती यांच्याजवळ समान चिंचोक्यांची संख्या होण्यासाठी ज्योतीला अजून किती चिंचोके गोळा करावे लागतील ? _____
* प्रकाश व गौरी यांच्याजवळ एकूण 60 चिंचोके आहेत. गौरी जवळ 24 चिंचोके असतील तर प्रकाशजवळ किती चिंचोके असतील ? _____

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती 4 :

शतकाला पोहोचण्याचा खेळ



© SCERT NOT TO BE REPUBLISHED



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

याप्रमाणे एकट्यांनी सांगितलेल्या संख्येला दुसऱ्यांनी 1 ते 9 च्या आतील संख्या मिळवावी. व बेरीज 100 येई पर्यंत खेळ सुरु ठेवावा. हा खेळ दोन विद्यार्थी किंवा दोन संघांमध्ये खेळू शकता. प्रथम शतकाला पोहचणाऱ्या विद्यार्थ्यांचा जय होतो.

मनातल्या मनात गणिते कर व चूक की बरोबर ते ओळख.

1) 10 + 10 = 20 + 5 = 25 + 6 = 31 ..... बरोबर


2) 50 - 5 = 45 - 10 = 35 - 4 = 30 ..... चूक


3) 25 + 3 = 28 + 4 = 32 + 5 = 39 .....


4) 60 - 3 = 57 - 5 = 52 - 6 = 46 .....


5) 40 + 9 = 49 + 8 = 57 + 7 = 64 .....


उत्तराच्या चौकोनापुढे ✓ किंवा × अशी खूण कर आणि मनातल्या मनात गणिते करुन रिकाम्या जागा भर.

1) 

2) 

3) 

4) 

5) 

नमुन्याप्रमाणे रिकाम्या जागा भर.

1) तीस - पाच = पंचवीस

2) चाळीस + आठ = _____

3) एकोणसाठ + सात = सहासष्ट

4) एकोणसाठ + नऊ= _____

5) नव्वद+ नऊ = नव्याण्णाव

6) पंधरा + दहा = _____

7) वीस + सतरा = _____

8) पंचेचाळीस - पंधरा = तीस

9) सत्तावीस - सतरा = _____

10) चौसष्ट + पंधरा = एकोणऐंशी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास 7.1

I. मनातल्या मनात गणिते कर. बरोबर असेल तर ✓ व चूक असेल तर × अशी खूण कर

1)	10	+	5	=	15	☑	2) 12	+ 7 = 20	☒
3)	18	+	10	=	28	☐	4) 15	+ 19 = 24	☐
5)	20	-	15	=	15	☐	6) 20	- 6 = 4	☐
7)	18	-	7	=	12	☐	8) 35	- 9 = 26	☐
9)	40	-	30	=	10	☐	10) 29	- 5 = 24	☐
11)	32	+	18	=	48	☐	12) 38	+ 8 = 56	☐
13)	50	-	32	=	28	☐	14) 42	- 12 = 20	☐
15)	25	+	35	=	60	☐	16) 59	+ 7 = 66	☐

II. मनातल्या मनात गणिते कर. बरोबर असेल तर ✓ व चूक असेल तर × खूण कर.

1) पंधरा + नऊ = चोवीस ☑
2) वीस - आठ = दहा ☐
3) पंधरा - दहा = पाच ☐
4) चोवीस + सोळा = पन्नास ☐
5) पंचेचाळीस - पंचवीस = वीस ☐

III. मनातल्या मनात गणिते करुन उत्तर लिही.

1) नऊ + बारा = एकवीस
2) अकरा + तेरा = ...
3) चोवीस - आठ = ...

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

4) बासष्ट + पंधरा = ...

5) एकतीस - दहा = ...

IV. मनातल्या मनात गणिते सोडव आणि रेष मारुन जोड्या जुळव.

'अ' गट	'ब' गट
1) 20 - 14	66
2) अठरा + बारा	80
3) पंचेचाळीस + पस्तीस	06
4) 29 + 7	30
5) नव्वद + चोवीस	25
	36

V. मनातल्या मनात गणिते करुन उत्तर लिही.

1) 10 + 8 = ☐ 2) 20 - 7 = ☐

3) 15 - 7 = ☐ 4) 38 + 7 = ☐

5) 18 + 9 = ☐ 6) 40 - 6 = ☐

7) 25 - 6 = ☐ 8) 39 + 8 = ☐

9) 42 + 8 = ☐ 10) 27 - 8 = ☐

VI. मनातल्या मनात गणिते करुन उत्तर लिही.

1) तुझ्याजवळ 18 गोटया आहेत. खेळात तू पुन्हा 17 गोटया जिंकल्यास तर तुझ्याजवळ असणाऱ्या गोटयांची एकूण संख्या किती? .....

2) तुझ्या वाढदिवसाच्यादिवशी मित्रांना देण्यास तुझ्याजवळ 45 चॉकलेट आहेत. त्यातील 32 चॉकलेटस् मित्रांना वाटल्यास तुझ्याजवळ राहिलेल्या चॉकलेटस् ची संख्या किती? .....


NOT TO BE REPUBLISHED @KTBS

3) तुझ्याजवळ 48 चिंचोके आहेत. त्यातील 25 चिंचोके खेळात गमावल्यास तुझ्याजवळ किती चिंचोके शिल्लक राहिले?

4) आईस्क्रीमच्या डब्यात 87 आईस्क्रीम आहेत. त्यामध्ये 9 आईस्क्रीम घातल्यास त्या डब्यात एकूण किती आईस्क्रीम होतील?


5) दुकानात 60 लाडू होते. त्यातील 29 लाडू विकल्यास किती लाडू शिल्लक राहतील ?

शिडीवर माकडाचा उड्या मारण्याचा खेळ



माकड शिडीवर उडया मारत आहे. एका वेळेला 2 पायऱ्यापर्यंत. दुसऱ्या वेळेला 4 पायऱ्यापर्यंत, तिसऱ्या वेळेला 8 पायऱ्यापर्यंत उडया मारतो तर 32 पायऱ्यार्यंत चढण्यास माकडाला किती वेळा उडया माराव्या लागतील? विचारकर.

दिलेली वस्तू दुप्पट करणाऱ्या जादूगाराचा खेळ.



वाचून समजून घे

10 च्या दुप्पट =20	15 ची दुप्पट = 30
11 ची दुप्पट = ...	30 ची दुप्पट = 60
13 ची दुप्पट = 26	40 ची दुप्पट= .....
19 ची दुप्पट = ...	21 ची दुप्पट = 42
27 ची दुप्पट = ...	17 ची दुप्पट = ...


उरलेल्या संख्या मनातल्या मनात घेऊन तूच दुप्पट कर.

@KBS NOT TO BE REPUBLISHED

निरीक्षण कर

* कोणत्याही संख्येला दोनने गुणल्यास त्याची किंमत दुप्पट होते.
* कोणत्याही संख्येत तीच संख्या मिळविल्यास त्याची किंमत दुप्पट होते.

गेटच्या खाली लिहिलेली संख्या दुप्पट करुन ती संख्या वरच्या भागात लिही.



ट्विंकलला दूध पिण्यास जायचे आहे. एकेक गेट पार करुन जावे लागते. गेटच्या खालच्या भागात असलेल्या संख्येच्या दुप्पट संख्या गेटच्या वरच्या भागात लिहिली तरच गेट उघडले जाते. बरोबर उत्तर लिहिण्यास ट्विंकलला मदत कर.

संख्या दुप्पट करण्याचा खेळ

खेळाचे नियम :

* तुझ्या मित्राबरोबर/मैत्रिणीबरोबर मिळून हा खेळ खेळा.
* दोन अंकी संख्या वापरुन हा खेळ खेळा.




© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

या प्रमाणे खेळ सुरु ठेवा.

चुकीचे उत्तर सांगणारा विद्यार्थी खेळातून बाद होतो.

अभ्यास 7.2

1) कोणत्या भांडयाला कोणते टोपण व्यवस्थित बसते याचा शोध घे.
टोपणावर संख्या आहे. भांडयावर त्या संख्येच्या दुप्पट संख्या आहे. रेष मारुन जुळव



2) खालील संख्येच्या दुप्पट संख्या लिही.

10 → 20	16 →	25 →
11 →	17 →	30 →
12 →	18 →	35 →
13 →	19 →	40 →
14 →	20 →	45 →
15 →	21 →	48 →

3) खालील संख्येच्या दुप्पट करुन नमुन्यात दाखविल्याप्रमाणे लिही.

नमुना : एकोणीस - अडतीस

1) वीस →
2) सव्वीस →
3) अडतीस →
4) बत्तीस →
5) सत्तावीस →
6) चव्वेचाळीस →


@KTBS NOT TO BE REPUBLISHED


4) मनातल्या मनात 2 ने गुणा व दुप्पट संख्या लिही.

×	7	9	12	24	36	43	49	50	100
2	14								

कृती कर व खेळ

चित्रात दाखविल्या प्रमाणे दोन पुठ्ठे कापून घे व त्यावर संख्या लिही. लहान पुठ्ठ्यावर एक संख्या व मोठया पुठ्ठ्यावर त्या संख्येच्या दुप्पट असलेली संख्या लिही.





@KTPS NOT TO BE REPUBLISHED

मोठा पुठ्ठा व लहान पुठ्ठा एकावर एक ठेवून मध्यभागी एक छिद्र मारा व दोऱ्याच्या सहाय्याने बांधा. दोन्ही पुठ्ठे फिरवून संख्या व दुप्पट संख्या बरोबर जुळतील असे करा. सर्व संख्या व त्या संख्येची दुप्पट संख्या जुळवून पूर्ण होईपर्यंत चक्र फिरवत रहा.

*****

प्रकरण 8

अपूर्णांकांची संख्या

B3I5A8

हे प्रकरण शिकल्यानंतर तू

* पूर्णांकामध्ये अर्धा, पाव, पाऊण भाग ओळखशील व दैनंदिन जीवनात त्याचा संबंध समजून घेशील.
* सांख्यिक रुपातील अर्धा $\frac{1}{2}$, पाव $\frac{1}{4}$, पाऊण $\frac{3}{4}$ हे अपूर्णांक ओळखशील व अर्थ समजून घेशील.

अर्धा, पाव, पाऊण




NOT TO BE REPUBLISHED

किरणच्या आईने किरणला एक भाकरी दिली व टॉ ीला ती भाकरी वाढण्यास सांगितले. हे पाहून तिच्या बहिणीने ज्योतीने मला पण टॉ ीला वाढण्यास एक भाकरी दे म्हणून हट्ट केला. आईने तिचा हट्ट पूर्ण करण्यास-ठी त्या भाकरीचे दोन तुकडे करुन प्रत्येकाला अर्धी, अर्धी भाकरी टॉ ीला वाढण्यास सांगितले.



चित्रांचे निरीक्षण कर अर्धाभाग कोणता ते समजून घे.

एक भाकरी



दोन समान भाग




भाकरीचा अर्धा भाग



एक पान



दोन समान भाग



पानाचा अर्धा भाग



एक केक




दोन सम भाग




केकचा अर्धाभाग



एक बिस्कीट




दोन समान भाग




बिस्किटाचा अर्धा भाग




एक चौकोन



दोन समान भाग




अर्ध्या भागात रंग दिला आहे.




NOT TO BE REPUBLISHED



* पिंपाच्या अर्ध्या भागात पाणी भरले आहे.
* पिंप अर्धे रिकामे आहे.




* चौकोनाच्या अर्ध्या भागात रंग दिला आहे.
* चौकोनाच्या अर्ध्या भागात रंग दिलेला नाही.




* अर्ध्या भागाला लाल रंग आहे
* अर्ध्या भागाला हिरवा रंग आहे.


खालील चित्रांचे निरीक्षण कर. दोन समान भाग करता येणाऱ्या चित्रांना ठिपके देऊन दोन समान भाग करु शकतोस का?


नमुना :

























@KTBS NOT TO BE REPUBLISHED














खालील अक्षरांच्या अर्ध्या भागाचे निरीक्षण कर. उरलेल्या अर्ध्या भागाचा अंदाज कर व नमुन्याप्रमाणे लिही.







_____



_____



_____


©KTBS NOT TO BE REPUBLISHED

लक्षात ठेव

* एकाच वस्तूचे दोन अर्धेभाग एकावर एक ठेऊन जोडल्यास त्या वस्तू समान जोडल्या जातात.
* दोन समान भागातल्या एका भागाला 'अर्धाभाग' असे म्हणतात.
* एकाच वस्तूचे दोन अर्धे भाग मिळविल्यास एक पूर्ण भाग होतो.

कृती कर व समजून घे.


खालील चित्रातील आकाराचे चार कागद घे. चित्रात दाखविल्या प्रमाणे रेषा मार. आता प्रत्येक कागदाचा अर्धाभाग होतो ना? कृतीकर व समजून घे.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाव भाग म्हणजे किती? समजून घे.


हया ब्रेडच्या तुकडयाचे चार समान भाग करुन चार मांजरीच्या पिल्लांना कसे वाटायचे?



* चार भागापैकी एका भागात तेल भरलेले आहे. म्हणजे पाव भागात तेल भरलेले आहे.








* एका चौकोनाच्या चार समान भागापैकी एका भागाला रंग दिला आहे. म्हणजे पाव भागाला रंग भरला आहे.





NOT TO BE REPUBLISHED @KTBS


* मेणबत्ती पेटण्यापूर्वी चार भाग होते त्या चार समान भागापैकी एक भाग जळालेला आहे. म्हणून पाव भाग जळालेला आहे.









* पुट्टीने चॉकलेटचे किती भाग खाल्ले आहेत ? चार समान भाग होते. त्यातला एक भाग खाल्ला आहे.





* या चित्रातील रंगवलेला भाग पाव भाग नाही. का ?





@KTBS NOT TO BE REPUBLISHED

लक्षात ठेव

* चार समान भागातील एका भागाला 'पाव भाग' असे म्हणतात.
* अर्ध्याच्या अर्ध्या भागाला 'पाव भाग' असे म्हणतात.
* एका पूर्णामध्ये चार पावभाग असतात.

कागद दुमडून पाऊण भाग समजून घे.


* एक कागद घेऊन त्यात चार समान भाग केले आहेत.
* एका सम भागाला हिरवा रंग दिला आहे हिरवा रंग दिलेला भाग हा पाव भाग आहे. हे तू समजून घेतले आहेस.
* तीन समभागाला लाल रंग भरला आहे. तर लाल रंग दिलेला भाग किती ? विचार कर

खालील चित्रांचे निरीक्षण कर


* ड्रमच्या (बॅरलच्या) चार सम भागापैकी तीन समभागात पाणी भरलेले आहे



* केकच्या चार समभागा पैकी एक भाग खाल्ला आहे.



* एका सफरचंदामध्ये चार समान भाग करुन त्यातला एक समभाग खाल्ला आहे.




लक्षात ठेव

* चार समान भागापैकी तीन समान भागांना पाऊण भाग असे म्हणतात.
* तीन पाव भाग म्हणजे पाऊण.


चित्र पहा व स्मरण कर






पाव भाग


© KTBS NOT TO BE REPUBLISHED



दोन पाव भाग (अर्धा)



तीन पाव भाग (पाऊण)




चार पाव भाग (पूर्ण)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


अभ्यास 8.1

I. नमुन्या प्रमाणे सुचविलेला भाग अपूर्णांकात लिही.


नमुना :




* रंगवलेला भाग = अर्धा
* न रंगवलेला भाग = अर्धा



* रंगवलेला भाग = अर्धा
* न रंगवलेला भाग = अर्धा




* हिरव्या रंगाने रंगवलेला भाग= .....
* लाल रंगाने रंगवलेला भाग = ...




* रंगवलेला भाग = ...
* न रंगवलेला भाग = ...

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


II. खालील चित्रात रंगवलेला भाग पहा व रेषा मारुन जोड्या जुळव.



अर्धा भाग




पाऊण भाग



पाव भाग

III. नमुन्याप्रमाणे अपूर्णांकात लिही.

नमूना: 

पाव किलो ग्रॅम



.....



.....

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

IV. नमुन्याप्रमाणे लिही.

नमूना : 

→ पाव रुपये



→ .....




→ .....




→ .....

V. सूचने प्रमाणे रंग भर.


1) चित्राच्या अर्ध्या भागाला रंग दे.



2) बॅरलच्या पाऊण भागाला रंग दे.




3) चित्राच्या पाव भागाला रंग दे.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

VI. दोन समान भाग होतील अशी रेषा मार व अर्ध्या भागाला रंग दे.




VII. चित्रातल्या पाव भागाला रेष मारुन रंग दे.



VIII. तुला आवडणारे कोणतेही चित्र काढ व नमुन्याप्रमाणे रंग भरुन दाखव.

नमुना: पावभाग



1) अर्धाभाग -

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


2) पाव भाग -

3) पाऊण भाग -

अर्धा, पाव व पाऊण यांचे सांख्यिकी रुप


अर्धा, पाव व पाऊण असे भाग कसे ओळखावेत हे तू शिकला आहेस. आता त्यांना असणाऱ्या सांख्यिकी रुपाची ओळख करुन घे.

1)



* चित्रात एकूण दोन समान भाग आहेत.
* चित्रातील एका भागाला रंग दिला आहे.
* रंगविलेल्या भागाला अपूर्णांकामध्ये अर्धा म्हणतात.
* अर्ध्या भागाच्या अपूर्णांकाच्या सांख्यिकी रुपाला $=\frac{1}{2}$ असे लिहितात.

2)




* चित्रातील समान भाग = दोन
* रंगविलेला भाग = एक
* रंगविलेल्या भागाचे अपूर्णांकातील सांख्यिकीरुप $=\frac{1}{2}$
* तर $\frac{1}{2}$ या अपूर्णांकाचा अर्थ काय होतो ?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED


एका वस्तूचे दोन समान भाग करुन एक समान भाग घेतला आहे असे सुचविणे म्हणजे अर्धाभाग = $\frac{1}{2}$

1)



* चित्रातील एकूण समान भाग 4
* रंगविलेला भाग = 1
* रंगविलेल्या भागाला अपूर्णांकात पाव भाग असे म्हणतात.

2)




* चित्रातील एकूण समभाग = 4
* रंगवलेला भाग = 1
* रंगवलेल्या भागाचे अपूर्णांकातील सांख्यिकी रुप = $\frac{1}{4}$

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

एका वस्तूचे चार समान भाग करुन त्यातला एक भाग घेतला आहे. असे सुचविणे म्हणजे पाव भाग.


अर्धा ($\frac{1}{2}$) व पाव भाग ($\frac{1}{4}$) समजून घेतल्या प्रमाणे पाऊण भागचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न कर.

1)



* एकूण समान भाग - 4
* रंगवलेले भाग - 3
* रंगविलेल्या भागाला अपूर्णांकामध्ये 'पाऊण' असे म्हणतात.
* पाऊण भागाचे अपूर्णांकातील सांख्यिकी रूप - $\frac{3}{4}$

2)



* चित्रातील एकूण समान भाग-4
* रंगवलेला भाग = 3
* रंगवलेल्या भागाला अपूर्णांकात ..... असे म्हणतात.
* पाऊण भागाचे सांख्यिकी रूप = ...


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

$\frac{3}{4}$ म्हणजे एका वस्तूमध्ये चार समान भाग करुन त्यातील तीन समान भाग घेतले आहेत. असे सुचविणे म्हणजे पाऊण भाग


* एका वस्तुत दोन समान भाग करुन एक समभाग घेतला आहे असे सुचविणे म्हणजे अर्धाभाग याचे संख्यिकी रुप = $\frac{1}{2}$
* एका वस्तूत चार समान भाग करुन एक समभाग घेतला आहे असे सुचविणे म्हणजे पाव भाग याचे सांख्यिकी रुप = $\frac{1}{4}$
* एका वस्तूत चार समान भाग करुन तीन समभाग घेतले आहेत असे सुचविणे म्हणजे पाऊण - याचे सांख्यिकी रुप = $\frac{3}{4}$

अभ्यास 8.2


I. चित्र पहा व रिकाम्या जागा भर.

1) 


* रंग दिलेल्या भागाचे अपूर्णांकातील सांख्यिकी रूप :.....

2) 


* रंग दिलेल्या भागाचे अपूर्णांकातीत सांख्यिकी रुप :.....

3) 

* रंग दिलेल्या भागाचे अपूर्णांकातील सांख्यिकी रुप :.....

4) 

* रंग दिलेल्या भागाचे अपूर्णांकातील सांख्यिकी रुप :.....

5) 




* रंग दिलेल्या भागाचे अपूर्णांकातील सांख्यिकी रूप :.....




II. रेषा मारुन जोड्या जुळव.




'अ'	'ब'
1) अर्धा भाग	$\frac{1}{4}$
2) पाव भाग	$\frac{3}{4}$
3) पाऊण भाग	$\frac{1}{2}$
	$\frac{1}{3}$

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

III. सांख्यि की रुप पाहून चित्रामध्ये रंग भर.

$\frac{1}{2}$   

$\frac{1}{4}$   

$\frac{3}{4}$   

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

IV. सांख्यिकी रुपात लिही.

1) अर्धाभाग →

2) पाव भाग →

3) पाऊण भाग →

V. नमुन्याप्रमाणे खालील अपूर्णांकांचा अर्थ लिही.

1) $\frac{1}{2}$ → दोन समान भाग करुन त्यातील एक भाग घेतला आहे.


2) $\frac{1}{4}$ →

3) $\frac{3}{4}$ →

VI. नमुन्या प्रमाणे खालील चित्रांचा अपूर्णांकामध्ये अर्थ लिही.

1) 

दोन समान भाग करुन एक भाग रंगवला आहे. रंगवलेला भाग अर्धा $(\frac{1}{2})$.

2) 

3) 

कृती :

मित्रांबरोबर फाशाचा (Dice) खेळ खेळा

एक फासा (Dice) घे. त्याच्या अमोरासमोरील बाजूवर $\frac{1}{2}$, $\frac{1}{4}$ व $\frac{3}{4}$ अपूर्णांक लिहिलेले स्टीकर चिकटव $\frac{1}{2}$, $\frac{1}{4}$, $\frac{3}{4}$ संकेत असलेली चित्रे तयार ठेव. (कमीतकमी 5 सेट)

तू व तुझे तीन मित्र यांनी गटात बसून खेळ खेळावयाचा आहे. गटाच्या मधोमध अपूर्णांकाचे संकेत असलेली भरपूर कार्डे ठेव. क्रमाने प्रत्येकाने फांसा टाकावयाचा आहे. फाश्याच्या वरच्या भागावर दिसणाऱ्या अपूर्णांकाला समान असे चित्रातील अपूर्णांकाचे कार्ड त्याने घ्यावयाचे आहे.

प्रत्येकाने आपापल्या पाळीप्रमाणे फासा टाकावयाचा व त्यावर असलेल्या अपूर्णांकाच्या किंमतीएवढे असलेले अपूर्णांकाच्या कार्डाचे चित्र घ्यावयाचे आहे. अपूर्णांकांची चित्रे संपेपर्यंत खेळ खेळावयाचा आहे. कोणता विद्यार्थी जास्त अपूर्णांकाची चित्रे बरोबर गोळा करतो त्याचा विजय होतो.

*****

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण 9

पैशाचे व्यवहार

A6M8V2

हे प्रकरण शिकल्यानंतर तू

* खेळातील नोटा व नाणी वापरुन रुपयाचे पैशात रुपांतर करशील.
* रुपांतर न करता रु. पैशाची बेरीज व वजाबाकी करशील.
* दरांची यादी व सोपी पावती याचा परिचय करुन घेशील.


रुपयाचे पैशात रुपांतर करणे


कृती - खेळातली नाणी व नोटा तयार कर

* टेबलावर एकेक नाणे ठेऊन त्यावर पातळ कागद ठेव.
* एका हाताने कागद घट्ट धरुन दुसऱ्या हाताने पेन्सिलीने. कागदावर अलगद घास नाण्याचे चित्र उमटेल.
* या प्रमाणे सर्व नाणी ठेवून त्यांची चित्रे काढ.
* सर्व नाण्यांच्या चित्रांचे भाग कापून घे.



* निरनिराळ्या नोटांच्या आकारांचे पांढरे कागद कापून घे.





© MTTC TO BE PUBLISHED













या कापून घेतलेल्या नोटांच्या आकाराच्या कागदावर नोटांची किंमत लिही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वेगवेगळ्या किंमतीच्या नोटा घेऊन त्याच्या समान किंमतीची नाणी दाखवा.



=


1 रुपया म्हणजे 100 पैसे. रुपयाचे चिन्ह - ₹

1 रुपया मृणजे 50 पैशांच्या दोन नाण्यांना समान



=

=

=


* 2 रुपये म्हणजे 1 रुपयाच्या दोन नाण्यांना समान आहेत.
* 2 रुपये म्हणजे 1 रुपयाचे एक नाणे व 50 पैशांची दोन नाणी यांना समान आहेत.
* 2 रुपये म्हणजे 50 पैशाच्या चार नाण्यांना समान आहेत.

2 रूपये म्हणजे 200 पैसे



=

=


* 5 रुपये म्हणजे 1 रुपयाच्या पाच नाण्यांना समान आहेत.
* 5 रुपये म्हणजे 2 रुपयाची 2 नाणी व एक रुपयाचे एक नाणे याला समान आहेत.

5 रुपये म्हणजे 500 पेसे

@ITBP NOT TO BE REPUBLISHED



* 10 रुपये म्हणजे 5 रुपयाच्या दोन नाण्यांना समान आहेत.
* 10 रुपये म्हणजे 2 रुपयाच्या पाच नाण्यांना समान आहेत.
* 10 रूपये म्हणजे 1 रूपयाच्या दहा नाण्यांना समान आहेत.

10 रुपये म्हणजे 1000 पैसे

अभ्यास 9.1

I. Fill in the blanks

1. एक रुपयात 50 पैशांची नाणी _____ आहेत.
2. दोन रुपयात 50 पैशांची _____ नाणी आहेत.
3. दोन रुपयात 1 रुपयाचे _____ नाणे व 50 पैशांची _____ नाणी आहेत.
4. 1 रु. 50 पैशामध्ये, 50 पैशांची _____ नाणी आहेत.
5. 10 रुपयात, 5 रुपयाची _____ नाणी आहेत.
6. 20 रुपयात, 5 रुपयाची _____ नाणी आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

रेष मारुन जोडया जुळव

@KTBS TO BE REPUBLISHED

तोंडी व लेखी पैशाचे व्यवहार कसे करावे?



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

* दुकानदार त्या वहिची किंमत 20रु. 50 पैसे असे तोंडी सांगतो.
* शब्दरुपात ही किंमत वीस रुपये पन्नास पैसे असे लिहितो.
* संख्यारुपात लिहिताना प्रथम रुपये लिहून एक बिंदू ठेऊन (.) नंतर पैसे लिहितो. म्हणून संख्या रुपात ₹ 20.50 असे लिहितो.

अ.न.	तोंडी स्वरुपात	शब्दरुपात	संख्यारुपात
1.	20 रूपये 50 पैसे	वीस रूपये आणि पन्नास पैसे	₹ 20.50
2.	75 पैसे	पंचाहत्तर पैसे	₹ 0.75
3.	1 रुपया	एक रुपया	₹ 1.00
4.	10 रुपये 25 पैसे	दहा रुपये व पंचवीस पैसे	₹ 10.25
5.	50 रुपये	पन्नास रुपये	₹ 50.00

लक्षात ठेव

* भारत देशात पैशाचे चलन रुपया आहे.
* रुपयाचा लहान घटक म्हणजे पैसा.
* रुपये व पैसे हे शब्दरुपात व संख्यारुपात लिहिता येतात.

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास 9.2

I. रिकाम्या जागा भर.

1. भारत देशात वापरात असणाऱ्या पैशाचे चलन _____
2. रुपयाचा लहान घटक _____ आहे.
3. रुपयाचे चिन्ह _____
4. 2 रुपये संख्या रुपात _____ असे लिहितात.

II. प्रयत्न कर

	तोंडी स्वरुपात	शब्दरुपात	संख्यारुपात
1.		सहासष्ट पैसे	₹ 0.66
2.	1 रुपया		₹ 1.00
3.	20 रूपये 50 पैसे	वीस रूपये आणि पन्नास पैसे	
4.		ऐंशी रुपये पंचाहत्तर पैसे	
5.	96 रुपये 75 पैसे		

रुपयाचे पैशात रुपांतर करणे

1 रुपया = 100 पैसे हे तुला माहित आहे.

उदाहरण : (फक्त रुपये असतील तर)

2 रुपये = 2 × 100 = 200 पैसे

7 रुपये = 7 × 100 = 700 पैसे

8 रुपये = 8 × 100 = 800 पैसे

10 रुपये = 10 × 100 = 1000 पैसे

रुपये	100 ने गुणा	पैसे
₹ 3	3 × 100	300 पैसे
₹ 5	5 × 100	500 पैसे
₹ 6	6 × 100	600 पैसे
₹ 9	9 × 100	900 पैसे

रुपया/रुपये यांचे पैशात रुपांतर करताना
100 ने गुण.

रुपये व पैसे दोन्ही असल्यास पैशात रुपांतर करणे.

उदाहरण :

1 रुपया 25 पैसे = (1 × 100) + 25
= 100 पैसे + 25 पैसे
= 125 पैसे

5 रुपया 50 पैसे = (5 × 100) + 50
= 500 पैसे + 50 पैसे
= 550 पैसे

@KIBS NOT TO BE REPUBLISHED

रुपये व पैसे	पैशामध्ये रुपांतर करण्याची पद्धत	पैसे
3 रूपये 50 पैसे	(3 × 100) + 50 300 पैसे + 50 पैसे 350 पैसे	350 पैसे
9 रूपये 05 पैसे	(9 × 100) + 05 900 पैसे + 05 पैसे 905 पैसे	905 पैसे

रुपये व पैसे यांचे पैशात रुपांतर करताना फक्त रुपयांना 100 ने गुणावे. व आलेल्या गुणलब्धामध्ये पैसे मिळवावेत.

मनातल्या मनात रुपयांचे पैशात कसे रुपांतर करतात ते समजून घे.

अ.नं.	रुपये	पैसे
1.	₹ 5.00	500 पैसे
2.	₹ 3.25	325 पैसे
3.	₹ 6.55	655 पैसे
4.	₹ 4.05	405 पैसे
5.	₹ 6.19	619 पैसे
6.	₹ 5.06	506 पैसे
7.	₹ 0.95	95 पैसे
8.	₹ 9.90	990 पैसे

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

रुपये व पैसे यांच्या मधोमध असणारा बिंदू काढून टाकल्यास उरणारी संख्या म्हणजेच पैसे.

अभ्यास 9.3

I. खालील रुपयांचे पैशात रुपांतर कर.

1) ₹ 3.00 = _____

2) ₹ 7.00 = _____

3) ₹ 8.00 = _____

4) ₹ 4.00 = _____

5) ₹ 6.00 = _____

6) ₹ 2.25 = _____

7) ₹ 6.25 = _____

8) ₹ 5.25 = _____

9) ₹ 7.75 = _____

10) ₹ 9.50 = _____

II. रिकाम्या जागा भर

	रुपये/पैसे	पैसे
1)	1 रुपया	100 पैसे
2)	5 रुपये	
3)	2 रुपये	
4)	1 रुपये 75 पैसे	
5)	8 रुपये 90 पैसे	
6)	5 रुपये 15 पैसे	
7)	7 रुपये 25 पैसे	
8)	8 रुपये 50 पैसे	

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पैशांची बेरीज व वजाबाकी

रकान्यामध्ये रुपये व पैसे लिहून त्याची बेरीज व वजाबाकी कशी करावी ते समजून घे.

उदा 1 : 26 रुपये 40 पैसे व 31 रुपये 20 पैसे यांची बेरीज कर.

रुपये	पैसे
26	40
+ 31	20
57	**60**

उत्तर : ₹ 57.60

- रुपयाच्या रकान्यात रुपये लिही.
- पैशाच्या रकान्यात पैसे लिही.
- पैशामध्ये पैसे मिळव व उत्तराच्या ठिकाणी लिही.
- रुपये व रुपयांची बेरीज कर व उत्तराच्या ठिकाणी लिही.

उदाहरण 2 :

₹ 42 . 60
+ ₹ 36 . 00
₹ 78 . 60

- संख्याची बेरीज करतो त्याप्रमाणे बेरीजकर.
- बिंदूच्या खाली बिंदू ठेव.
- उत्तराला ₹ असे लिही.

उदा 3 : 64 रुपये 80 पैशामधून 21 रुपये 30 पैसे वजा कर.

रुपये	पैसे
64	80
−21	30
43	50

उत्तर : ₹ 43.50

- रुपयाच्या रकान्यात रुपये लिही.
- पैशाच्या रकान्यात पैसे लिही.
- पैशातून पैसे वजा कर व उत्तराच्या ठिकाणी लिही.
- रुपयातून रुपये वजा कर व उत्तराच्या ठिकाणी लिही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उदा 4 : ₹ 80.75 मधून ₹ 35.60 वजा कर.

₹ 80 . 75
− ₹ 35 . 60
₹ 45 . 15

* संख्यांची वजाबाकी करतो त्याप्रमाणे. वजाबाकी कर.
* बिंदुच्या खाली बिंदू ठेव
* उत्तराला ₹ असे लिही.

चित्रात दिलेली वस्तू व त्याची किंमत याचे निरीक्षण कर.



₹ 2.00



₹ 18.25



₹ 13.75



₹ 40.00



₹ 20.50



₹ 25.50

तू व तुझ्या मित्राने खाली दाखविल्याप्रमाणे वस्तूंची खरेदी केली आहे. चित्रातील वस्तूंची किंमत पाहून खालील बेरीज बरोबर आहे की चूक आहे ते समजून घे

* एक पेन्सील व एक वही

रुपये	पैसे
2	00
18	25
20	**25**

* एक रंगीत खडूचा बॉक्स व एक वही.

रुपये	पैसे
20	50
18	25
38	**75**

* एक शाईची बाटली व एक पेन यांची किंमत किती होईल ? बेरीज कर.

रुपये	पैसे

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

तोंडी गणिते

खालील गणिते वाच. तोंडी गणिते कशी सोडवावीत ते समजून घे.

उदा 1: मेरीने दुकानातून ₹ 10.25 ला एक पेन व ₹ 18.25 ला एक वही विकत घेतल्यास खर्च केलेली एकूण रक्कम किती?

पेनसाठी खर्च केलेली रक्कम	=	₹	10 . 25
वहीसाठी खर्च केलेली रक्कम	=	₹	+ 18 . 25
खर्च केलेली एकूण रक्कम	=	₹	28 . 50

उदा 2: भावना जवळच्या पिगी बँक मध्ये ₹ 56.75 आहेत तिच्या आजोबांनी दिलेले ₹ 43.15 पण तिने त्या पिगी बँक मध्ये घातले तर आता पिगी बँकमध्ये किती रक्कम आहे?

प्रथम पिगी बँकमध्ये असलेली रक्कम	=	₹	56 . 75
आजोबांनी दिलेली रक्कम नंतर पिगी बँक मध्ये घातली	=	₹	+ 43 . 15
त्या पिगीबँकमध्ये आत्ता असलेली रक्कम	=	₹	99 . 90

उदा 3: राजू जवळ ₹ 85.50 रक्कम होती. त्यामध्ये ₹ 25.20 किंमतीचा चेंडू विकत आणल्यास त्याच्याजवळ आता किती रक्कम शिल्लक आहे?

राजू जवळची रक्कम	=	₹	85 . 50
चेंडू खरेदीखाठी खर्च झालेली रक्कम	=	₹ +	25 . 20
शिल्लक रक्कम	=	₹	60 . 30

तोंडी उदाहरणे सोडविताना

1. दिलेले संदर्भ माहितीसाठी लिहून घे.
2. एकूण किती असे विचारले असता, बेरीज कर.
3. शिल्लक किती, राहिले किती, किती जास्त आहे, किती कमी आहे. असे विचारले असता वजाबाकी कर.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास 9.4

I. खालील उदाहरणे सोडव.

1)

रुपये	पैसे
35	67
+ 21	32

2)

रुपये	पैसे
44	36
+ 52	61

3)

रुपये	पैसे
88	05
+ 11	90

4)

रुपये	पैसे
130	20
+ 61	70

5)

रुपये	पैसे
200	15
+ 65	32

6)

रुपये	पैसे
450	90
+ 35	05

7)

रुपये	पैसे
475	00
+ 20	75

8)

रुपये	पैसे
820	25
+ 25	50

9)

रुपये	पैसे
325	75
+ 25	00

10)

रुपये	पैसे
320	25
+ 425	25

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

II. खालील उदाहरणे सोडव.

1)

रुपये	पैसे
75	50
−30	15

2)

रुपये	पैसे
90	75
− 45	25

3)

रुपये	पैसे
37	50
− 25	30

4)

रुपये	पैसे
99	99
− 55	55

5)

रुपये	पैसे
85	75
− 50	65

6)

रुपये	पैसे
79	80
− 35	50

7)

रुपये	पैसे
120	25
− 50	20

8)

रुपये	पैसे
135	80
− 50	75

9)

रुपये	पैसे
100	75
− 75	25

10)

रुपये	पैसे
75	25
− 50	20

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

III. तोंडी उदाहरणे सोडव.

1. संजूने चॉकलेटसाठी ₹ 19.25 व बिस्कीटांसाठी ₹ 6.25 खर्च केल्यास त्याने एकूण किती रक्कम खर्च केल्यासारखे होईल ?
   - ✻ चॉकलेटसाठी खर्च केलेली रक्कम =
   - ✻ बिस्किटांसाठी खर्च केलेली रक्कम =
   - ✻ एकूण खर्च केलेली रक्कम =

2. सोनालीला तिच्या वडिलांनी ₹ 80 दिले व तिच्या आईने ₹ 25.25 दिले तर सोनालीजवळ असणारी एकूण रक्कम किती ?
   - ✻ वडिलांनी दिलेली रक्कम =
   - ✻ आईने दिलेली रक्कम =
   - ✻ एकूण रक्कम =

3. शेखरने ₹ 7.25 देऊन आईस्क्रीम ₹ 5.25 देऊन पेन विकत घेतल्यास शेखरने एकूण किती रक्कम खर्च केली आहे?

4. राधाने चित्रकला स्पर्धेत ₹ 75.50 किंमतीचे चित्र रंगविण्याचे पुस्तक व गणित प्रश्नमंजुषा स्पर्धेत ₹ 20.50 किंमतीचे गणित पुस्तक बक्षीस म्हणून मिळविले. तर तिने एकूण किती रक्कमेची पुस्तके बक्षीस म्हणून मिळविली आहेत?

5. मंजुने ₹ 38.25 देऊन ड्रॉईंगची पाने व ₹ 20.50 देऊन रंगीत खडू विकत घेतल्यास मंजूने एकूण किती रुपये खर्च केले?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

IV. तोंडी उदाहरणे सोडव.

1. रेखाने आपळ्या जवळील ₹ 125.50 मध्ये ₹ 13.75 एवढी रक्कम आईस्क्रीमसाठी खर्च केल्यास तिच्या जवळ किती रक्कम शिल्लक राहिली?

* रेखाजवळील रक्कम =
* आईस्क्रीमसाठी खर्च केलेली रक्कम =
* शिल्लक रक्कम =

2. शशांकने आपल्याजवळ असलेल्या ₹125.50 रक्कमेतून ₹ 75.25 खर्च करुन आपल्या बहिणीसाठी एक बाहुली विकत घेतली. तर त्याच्या जवळ किती रक्कम शिल्लक राहिली?

* शशांकजवळ असलेली रक्कम =
* बाहुली विकत घेण्यासाठी खर्च केलेली रक्कम =
* शिल्लक रक्कम =

3. जयाजवळ ₹ 20.00 रक्कम होती त्यातले ₹ 15.50 देऊन टॉमॅटो विकत घेतल्यास जयाजवळ किती रक्कम शिल्लक राहिली असेल?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. तुझ्या जवळ असलेल्या ₹ 100.75 मध्ये वाढदिवसासाठी ₹ 50.25 किंमतीची चॉकलेटस विकत घेतल्यास तुझ्याजवळ किती रक्कम शिल्लक राहील?

5. तुझ्या वडिलांनी तुला ₹ 50.75 दिले आहेत. व तुझ्या भावाला ₹ 25.50 दिले आहेत. तर तुझ्या भावापेक्षा तुला किती रक्कम जास्त मिळाली आहे?

दर यादी





याचा उपयोग काय बाबा?

खरेदी केलेल्या वस्तूंचे किती पैसे द्यावेत हे आपण समजून घेऊ शकतो. हे पहा 1 कि. ग्रॅ. तांदळाची किंमत ₹ 31.00





आता तू एक कि.ग्रॅ. साखरेची किंमत किती ते सांग पाहू?

हो माहित झाले 28 रुपये




© NCERT NOT TO BE REPUBLISHED

प्रत्येक दुकानात दर-यादी लावलेली असते. यापासून आम्हाला त्या वस्तूंचे दर कळतात व हव्या असलेल्या वस्तू त्या दुकानातून खरेदी करण्यास मदत होते.

आता बेकरीच्या दुकानात लावलेल्या दर यादीचे निरीक्षण कर.

आनंद बेकरी



दर - फलक

वस्तु	नग	किंमत
ब्रेड	1 पौंड	₹ 12.00
केक	1	₹ 5.50
चॉकलेट	1	₹ 2.00
व्हेज पफ	1	₹ 10.00
नॉनव्हेज पफ	1	₹ 11.00

NOT TO BE REPUBLISHED @KET

प्रीतीला यामधील काही खाद्यपदार्थांची खरेदी करावयाची आहे. त्या खाद्यपदार्थांची किंमत समजून घेण्यासाठी तिला मदत कर.

1 व्हेज पफ = ...

1 पौंड ब्रेड = ...

1 चॉकलेट = ...

साधी पावती



पावती KST 001234
श्री टेक्सटाईल्स CST 007568
एम.जी.रोड, कलबुर्गी

पावती नं : 15702 दिनांक: 10-01-2014
नाव : राजेन्द्र

क्र.सं	वस्तुचे विवरण	नग	प्रत्येकी दर	एकूण किंमत
1	शर्ट	1	250	₹ 250.00
2.	साडी	1	725	₹ 725.00
3.	चुडीदार	1	375	₹ 375.00
	एकूण	3		₹1350.00
			VAT	₹70.00
				1420.00

(अक्षरात: एक हजार चारशे वीस रुपये फक्त)

दुकान मालकाची सही

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

सदर पावतीमुळे अपणास खालील गोष्टी समजून येतात.

* दुकानाचे नाव व पत्ता
* पावती क्रमांक व खरेदी केलेली तारीख
* ग्राहकाचे नाव (खरेदी करणाऱ्याचे नाव)
* खरेदी केलेल्या प्रत्येक वस्तूची किंमत व एकूण किंमत.
* आपण खरेदी केलेल्या वस्तूसाठी एकूण द्यावयाची रक्कम अंकात व अक्षरात नमूद केलेली असते.
* दुकानाच्या मालकाची सही.

इम्रानने पुस्तकाच्या दुकानातून 200 पेजीसची 1 वही, 100 पेजीसच्या 2 वह्या व 5 पेन्सीली विकत घेतल्या आहेत.

दुकानात लावलेली दर - यादी व दुकानदाराने दिलेली पावती याचे निरीक्षण कर. व बरोबर आहे का? हे तपासून पहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

दर यादी	
वस्तुचे विवरण	**प्रत्येकी किंमत**
200 पेजीस वही	₹ 30.00
100 पेजीस वही	₹ 15.00
खोडरबर	₹ 5.00
पेन	₹ 10.00
पेन्सील	₹ 4.00

पावती
राजाराम पुस्तकालय
शिवमोग्गा

KST No 0243
CST No 0456

पावती क्रमांक : 453 दिनांक: 15-03-11

नाव : इम्रान

अनु.न.	वस्तुचे विवरण	नग	एका वस्तूची किंमत	एकूण किंमत
1	200 पेजीस वही	1	₹ 30.00	₹ 30.00
2.	100 पेजीस वही	2	₹ 15.00	₹ 30.00
3.	पेन्सिल	5	₹ 4.00	₹ 20.00
			vat	₹ 3.20
	एकूण	8		**83=20**

(अक्षरी : त्र्याऐंशी रुपये वीस पैसे फक्त)

दुकान मालकाची सही

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास 9.5

रिकाम्या जागा भरा.

1. दुकानाच्या मालकाकडून घेतलेल्या व खरेदी केलेल्या वस्तूंचे विवरण असलेल्या चिठ्ठीला ..... म्हणतात.

2. दुकानात लावलेल्या प्रत्येक वस्तूंची किंमत सुचविणाऱ्या फलकास ..... असे म्हणतात.

3. पावतीमध्ये ग्राहकाने द्यावयाची एकूण रक्कम अंकात व ..... लिहिलेली असते.

* खालील पावतीचे निरीक्षण कर व प्रश्नांची उत्तरे दे.

पावती

जगदंबा टेक्सटाईल्स

बेंगळूरु

KST No 0453
CST No 06567

पावती क्रमाक : 301 दिनांक: 30-12-2011

नाव : पार्वती

क्र.सं.	वस्तुंचे विवरण	नग	प्रत्येकी किमंत	एकूण किंमत
1	साडी	1	₹ 450.00	₹450.00
2.	झंपर पीस	2	₹ 25.00	₹50.00
3.	रुमाल	5	₹ 10.00	₹ 50.00
	VAT 4%			₹ 22.50
	एकूण			572.50

अक्षरी : पाचशे बाहत्तर व पन्नास पैसे मात्र

दुकानदाराची सही.

1. ग्राहकाचे नांव काय? .....

2. खरेदी केलेल्या साडीची किंमत किती? .....

3. एका रुमालाची किंमत किती? .....

4. दुकानदाराला एकूण किती रक्कम घावी लागेल? .....

5. पावती क्रमांक किती? .....

कृती : तुझ्या घरात उपलब्ध असलेल्या पावत्या गोळा कर व त्यामधील विवरण समजून घे.

*****

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण 10

मापने

R8U9A4

हे प्रकरण शिकल्यानंतर तू

* मापनासाठी असलेल्या परिमाणाची आवश्यकता समजून घेशील.
* मापनासाठी योग्य अशा परिमाणाची निवड करु शकशील.
* मापनाचे साधन कसे वापरावे ते समजून घेशील.
* वस्तूंची लांबी मीटर व सेंटीमीटर मध्ये मोजण्याचे कौशल्य प्राप्त करु शकशील.
* वस्तूंच्या लांबीचा अंदाज करु शकशील.
* अंदाज केलेल्या वस्तूची लांबी मोजपट्टी (डलरश्रश) च्या सहाय्याने मोजून तपासून पाहशील.
* अंदाजे लांबी व प्रत्यक्षात त्या वस्तूची लांबी यांच्यातील फरक समजून घेशील.
* अनौपचारिक मापनाचा वापर करुन वस्तूंचे वजन करशील.
* प्रत्यक्षात त्या वस्तूचे वजन किती ते समजून घेशील.
* अनौपचारिक मापनाचा वापर करुन त्या वस्तूचे संग्रह सामर्थ्य किती? याचा अंदाज करशील.
* द्रव मापनाचे मूळ परिमाण समजून घेशील.
* कॅलेंडरच्या सहाय्याने दिवस व तारीख लिहिशील.
* तास व मिनिटे यांना अनुसरुन वेळ किती? ते सांगण्याचे सामर्थ्य प्राप्त करु शकशील.
* दैनंदिन करावयाची कामे वेळेनुसार क्रमाने जोडू शकशील.

@KRBS NOT TO BE REPUBLISHED

सणाची तयारी

गणेश चतुर्थीच्या सणाकरिता फुले आणण्यासाठी ज्योती तिच्या वडिलांबरोबर बाजारात जाते. तेथे वडील फुले विकत घेत असताना ती निरीक्षण करते.



ज्योती : बाबा हे पहा ही फुलं फारच छान आहेत.
वडील : अहो, फुले द्या.
फुले विकणारा : किती फुले पाहिजेत तुम्हाला?
वडील : एक हात फुले पाहिजेत त्याची किंमत किती होईल?
फुले विकणाऱ्याचा मुलगा :'एक हात फुलांना दहा रुपये.
वडील : एक हात फुले द्या.
फुले विकणाऱ्याचा मुळगा : बाबा मीच मोजून देतो.
वडील : नको बाळ, तुझे वडीलच मोजून देऊ देत.
ज्योती : बाबा त्या मुलालाच मोजून द्यायला सांगा ना!
वडील : नको ज्योती, त्याच्या वडिलाने मोजून दिल्यास जास्त फुले मिळतात.
ज्योती : ते कसे बाबा कोणीही मोजले तरी फुले एक हातच मोजून मिळणार ना?
वडील : हो, तुम्ही दोघांनी प्रत्येकी एक हात मापनाची फुले द्या
ज्योती : (त्या दोन्ही फुलांच्या मापाची तुलना करुन) अरे! दोघांनी प्रत्येकी एक हात फुले दिली असली तरी फरक दिसतो ना?
वडील : मुलांने मापलेला हात त्याच्या वडिलांनी मापलेल्या हाता पेक्षा लहान आहे. मुलाचा हात लहान असल्याने असा फरक दिसतो.
ज्योती : तसे असेल तर कोणीही मोजल्यास समान मापनाच्या वस्तू मिळतील अशा परिमाणाचा उपयोग करता येईल ना?

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

मापन कसे ? किती ?

कुमार, रम्या, सलमा व जॉन कुतूहलाने आपल्या वर्गातील फळ्याची लांबी वीतीचा वापर करुन पाहात आहेत.



शिक्षक : मुलांनो काय करत आहात ?

मुले : आमच्या वीतीचा वापर करुन फळ्याच्या लांबीचे मापन करत आहोत.

शिक्षक : प्रत्येकाचे मापन समान आले आहे का ?

मुले : नाही सर.

शिक्षक : तसे असेल तर ही मोजपट्टी घ्या. सर्वांनी या मोजपट्टीच्या सहाय्याने फळ्याची लांबी मोजा व कोष्टक पूर्ण करा.


विद्यार्थ्याचे नाव	मोज पट्टीने मोजल्यास
कुमार	20 वेळा
सलमा	20 वेळा
रम्या	20 वेळा
जॉन	20 वेळा

मापनाचे निरीक्षण करा. सर्वांचे मापन समान आले आहे का ? विचार कर.

सर्व विद्यार्थ्यांनी एकाच मोजपट्टीचा वापर केल्याने सर्वांचे मापन समान आले आहे.

© KSBS NOT TO BE REPUBLISHED

मोजपट्टीचे निरीक्षण कर



या मोजपट्टीतील पहिली संख्या कोणती ?

या मोजपट्टीतील शेवटची संख्या कोणती ?

या मोजपट्टीत किती मोठ्या रेषा आहेत ?

प्रत्येक मोठ्या रेषामंध्ये लहान रेषा किती आहेत ?

9 लहान रेषा व 1 मोठी रेषा मिळून एकूण 10 समान भागातील एका गटाला एक सेंटीमीटर असे म्हणतात. लिहिताना 1 सें.मी. असे लिहितात. ही एक लहान मोजपट्टी 15 सेंटीमीटर लांबीची असते.

या मोजपट्टीचा वापर करुन आम्ही कांही वस्तूंची लांबी मोजू शकतो.


चित्राचे निरीक्षण कर व मापण्याची पद्धत समजून घे.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

I. मोजपट्टीच्या सहाय्याने खालील चित्रांची लांबी मोज व चौकटीत लिही.












@KTBS NOT TO BE REPUBLISHED


अभ्यास 10.1


खालील चित्रात दिलेल्या वस्तूची लांबी से.मी. मध्ये मोज व चौकटीत लिही.

1. 

2. 

3. 

4. 

5. 

NOT TO BE REPUBLISHED © KTDS

6. 

7. 

मीटर मोजपट्टी




तू कापडाच्या दुकानात कापड कसे मोजतात हे पाहिले आहेस काय? या दुकानात मोठी मोजपट्टी का वापरतात? विचार कर.

जास्त लांबीची वस्तू मापण्यास लहान मोज पट्टीच्या वापर करणे योग्य होत नाही. त्यामुळे फार श्रम होतात व जास्त वेळ वाया जातो, म्हणून मोठ्या मोजपट्टीचा वापर करतात. या मोठया मोजपट्टीला 'मीटर मोजपट्टी' म्हणतात.

1 मीटर पट्टी 100 सेंटीमीटर लांबीची असते. म्हणून 1 मीटर = 100 से.मी.

1 मीटर = 100 सें मी



© CHILDREN'S BOOK BUREAU NOT TO BE REPUBLISHED

खाली दिलेल्या यादीतील वस्तू मापण्यास योग्य अशी मोजपट्टी कोणती याचा विचार कर व ✓अशी खूण कर.

मापन	सें मी पट्टी	मीटर पट्टी
पेनची लांबी	✓	
खोलीची लांबी		
क्रिकेट बॅटची लांबी		
खेळाच्या मैदानाची लांबी		
दरवाजाची लांबी		✓
पुस्तकाची लांबी		
साडीची लांबी		
खोडरबरची लांबी		
पेन्सिलची लांबी		


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उपलब्ध असेल तर प्रत्यक्षात मीटर पट्टी व उपलब्ध नसेल तर तू तयार केलेल्या मोजपट्टीचा वापर करुन खालील मापने मोज व चौकटीत लिही.

* फळ्याची लांबी ☐
* टेबलाची लांबी ☐
* बाकाची लांबी ☐
* दरवाजाची रुंदी ☐
* तू बसलेल्या जागेपासून फळ्यापर्यंतचे अंतर ☐
* खोलीतील 2 भिंतीमधील अंतर ☐

अभ्यास 10.2

I. खालील चित्रातील प्रत्येक रंगाच्या पट्टीची लांबी योग्य अशा मोजपट्टीने माप व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दे.



रंगाची पट्टी	लांबी सें.मी. मध्ये
पांढरा	
निळा	
हिरवा	
केशरी	
लाल	
पिवळा	


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

* लाल रंगाच्या पट्टी पेक्षा कमी लांबी असलेल्या रंगाच्या पट्ट्या ....., ..., ...
* सर्वात जास्त लांबीची रंगाची पट्टी .....
* सर्वात कमी लांबीची रंगाची पट्टी .....
* निळ्या व पिवळ्या रंगाच्या पट्ट्यांची एकूण लांबी .....

* पांढऱ्या व पिवळ्या रंगाच्या पट्ट्यांच्या लांबीतील फरक.....

* हिरव्या रंगाची पट्टी, निळ्या रंगाच्या पट्टीच्या लांबी एवढी होण्यास ..... से.मी. ची आवश्यकता आहे.

II. या खालील चित्रामध्ये निरनिराळ्या बाजूंची लांबी मोज व चित्रा मध्ये नमूद कर.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

III. तुझ्या वर्गखोलीची लांबी, रुंदी मोज व जवळच्या मीटरमध्ये लिही.

1) वर्ग खोलीची लांबी .....

2) वर्ग खोलीची रुंदी.....

अंदाज कर व मोजून बघ

खालील चित्रांकडे बघ. व अंदाजे लांबी सांग नंतर प्रत्यक्षात मोजपट्टीच्या सहाय्याने लांबी मोज. तू केलेला अंदाज व प्रत्यक्षात त्याची लांबी किती ते तपासून बघ.

* 


अंदाजे मापन ☐
प्रत्यक्षात मापन ☐

* 

अंदाजे मापन ☐
प्रत्यक्षात मापन ☐

*

अंदाजे मापन ☐
